# भारती विद्यापीठ
# अभिमत विश्वविद्यालय, पुणे

नॅक द्वारे पुर्नमुल्यांकनात 'A+' दर्जा प्राप्त
केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे 'A' दर्जा प्राप्त

Estd. 1964
Celebrating 55 and Beyond
BHARATI VIDYAPEETH
Founder Chancellor : Dr. Patangrao Kadam

# अभिजीत कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड सोशल सायन्सेस, सोलापूर

आयोजित

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे 43 वे राष्ट्रीय अधिवेशन

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

# अर्थभारती

स्मरणिका २०१९-२०



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | महात्मा गांधी: एक निराशावादी अर्थशात्रज्ञ | डॉ.उमेश राजदेरकर | २१ |
| २२ | महात्मा गांधीचा आर्थिक विचार कालबाह्य की समर्पक ? | डॉ. रूपा शहा | २२ |
| २३ | महात्मा गांधीजींचे विचार सर्वसमावेशक | प्रा. रवींद्र बा. शेंडे | २३ |
| २४ | महात्मा गांधी व आपल्या अजूनश्रमप्रतिष्ठा | प्रा. महादेव गुरुलिंग पाटील | २४ |
| २५ | ग्रामोन्मुख विकेंद्रित अर्थव्यवस्था | डॉ. वर्षा कमलाकर नेहेते<br>प्रा. कल्पना व. भागवत | २५ |
| २६ | महात्मा गांधीचे आर्थिक विचार आणि शाश्वत विकास | डॉ. राजू कथ्थु शिंदे<br>श्री. कमलेश भिमराज विसपूते | २६ |
| २७ | हवामान बदल, जागतिक पर्यावरण संकट आणि मा. गांधी | डॉ. विकास प्रल्हादराव सावंत | २७ |
| २८ | महात्मा गांधीजींच्या स्वयंपूर्ण खेड्यांची वर्तमानकालीन यथार्थता | प्राचार्य डॉ. एस. के. ढगे | २८ |
| २९ | ग्रामीण विकास व महात्मा गांधीचे आर्थिक विचार | डॉ. महेंद्र गावंडे<br>डॉ. संजय धनवटे | २९ |
| ३० | महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची समर्पकता | प्रा. हेमराज चौधरी | ३० |
| ३१ | गांधीवादी अर्थशास्त्र : मानव कल्याणाचा दिपस्तंभ | डॉ. मधुकर रामचंद्र वेदपाठक | ३१ |
| ३२ | महात्मा गांधींचे स्वदेशी अर्थकारण | डॉ. सुनीता एस. राठोड | ३२ |
| ३३ | महात्मा गांधींची सप्तमिती हिच शाश्वत विकासाची गुरुकिल्ली | डॉ. पी.ई. विभुते<br>डॉ. यू.पी. विभुते | ३३ |
| ३४ | खादी व गांधी विचार | डॉ. हाशिम वलांडकर | ३४ |
| ३५ | गांधीवादी विकास प्रतिमानाचीसमर्पकता: एक विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. डी. डी. भोसले | ३५ |
| ३६ | गांधी विचारांची मीमांसा | डॉ. व्यंकटराव हनमंतराव पाटील | ३६ |
| ३७ | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार | डॉ. दिलीप पांडुरंग महाजन<br>डॉ. राजेंद्र रामराव गव्हाळे<br>डॉ. राजेंद्र बा.भांडवलकर | ३७ |
| ३८ | महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची काळाला गरज | डॉ.ए. एम. कोरडे<br>पूजा सोपान धनवटे | ३८ |
| ३९ | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार | सौ. मनीषा मनोज चौधरी | ३९ |
| ४० | महात्मा गांधींचे ग्रामीण विकासा विषयीचे विचार | डॉ. जगन्नाथ शामराव पाटील<br>डॉ. बंडू जयसिंग कदम | ४० |
| ४१ | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास | डॉ. उषा एन. पाटील | ४१ |

# महात्मा गांधींजींचे विचार सर्वसमावेशक

■ प्रा. रविंद्र बोंडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
सभासद क्रमांक १७५९

## गोषवारा

संपूर्ण भारतभर गांधींजींची १५० वी जयंती वर्षे (२०१८-१९) साजरे होत आहे. गांधींजींचे समग्र विचार सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देणारे होते. परंतु खरोखर सर्वसमावेशकतेची संकल्पना भारतीय समाजात रूजत जात आहे काय? नसेल तर गळत्या कोणत्या? उपाययोजना यावर तात्काळ करता येईल काय? सर्वसमावेशकता हरविल्यास हिंसेला उत्तेजन मिळतील. यावर महात्मा गांधींच्या विचाराद्वारे व अहिंसेच्या धाग्याद्वारे उपाययोजना शक्य आहे. या प्रेरणेतून व विश्वासातून हा विषय निवडण्यात आला आहे. विषयाच्या विश्लेषणासाठी दुय्यम सामुग्रीचाच आधार घेण्यात आलेला आहे.

महात्मा गांधीजींच्या दोन प्रातिनिधिक प्रसंगावरून आपणास त्यांच्या विचारामधील सर्वसमावेशकतेचा पुर्ण अंदाज येते. १) बहुमत तयार होणार या दृष्टिकोणातून वैयक्तिक मत मांडल्यानंतर ते खोटे ठरल्यास बहुमताचा आदर आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रेरणा देणे व आनंदाने सहभागी होणे. २) खादीसाठी अविरत प्रयत्न केले आणि स्वत: मात्र काही अंशी कपड्यांचा त्याग केलेला दिसून येते. संपूर्ण भारतीयांची कापडाची गरज पूर्ण करण्याचा त्यामागचा हेतू होता. खरोखरच यावरून ओळखता येते की, महात्मा गांधींजींचे समग्र विचार सर्वसमावेशकतेला चालणा व प्रेरणा देणारे होते.

आधुनिक काळात बाजारपेठेच्या माध्यमातून सर्व देश अधिक विकसित बनत जात असले तरी 'स्वस्ताईचे अर्थशास्त्र' महात्मा गांधी यांना कधिच रूचले नाही. सर्वांच्या मर्यादित गरजांची पुर्तता होणार अशी महागाईची परंतु संतुलित बाजारपेठ महात्मा गांधींना अपेक्षित होती. आज प्रत्येक देश स्वस्ताईचे अर्थशास्त्र वापरत असतांना संरक्षणवादी धोरणामार्फत संतुलित धोरणाला पाठींबा देत आहे. अशा विरोधाभास वातावरणाऐवजी महागाईचे अर्थशास्त्र केव्हाही चांगले व देशाच्या सर्वसमावेशक विकासासाठी पोषक असते. यावर गांधींजींचा पूर्ण विश्वास होता.

म. गांधींनी प्रथमता संपूर्ण भारताचा प्रवास करून तसेच विश्वास संपादन करून देशाचे नेतृत्व स्विकारले आहे. महात्मा गांधींजींच्या एकूण विचारातच सर्वसमावेशकतेचे सूत्र अंतर्भूत आहे. ''भारत हा माझा सर्वाधिक प्रिय देश आहे'' ही विचारसरणी गांधींजींची असली तरी इतरही देशांच्या प्रत्येक साधनांचा वापर कौशल्यपूर्ण करता येईल (मर्यादा लक्षात घेवुन) असा विचार त्यांच्या समग्र विचारात आहे. श्रम हे धनापेक्षा श्रेष्ठ आहे. सुसंस्कृत कुटुंब हीच एक मोठी आदर्श शाळा आहे. ''खेड्यांकडे चला'' वरील संदेश आधुनिक काळातही सर्वसमावेशक विकासाला प्रोत्साहित करित आहे. महात्मा गांधींजींचे समग्र विचार आधुनिक तंत्रज्ञानापेक्षाही मजबूत असल्यामूळे त्याचा वापर व सर्वांना वेळोवेळी सुचणाऱ्या युक्त्या व उपलब्ध असणाऱ्या युक्त्यांचा वापर करून देशाचा तसेच जागतिक अर्थव्यवस्थेचा शाश्वत व सर्वसमावेशक विकास वाढविणे एकूणच अपेक्षित आहे.

■ ■ ■



Scanned with OKEN Scanner